# महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

वैद्यकीय शिक्षण व संशोधन, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत,चौथा मजला,सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.वेबसाईट: www.msbnpe.org ई-मेल- msbnpe@gmail.com ,मो. नं: ८६५२२८१०२६

**MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION**

Directorate of Medical Education and Research, 4th Floor, St.Georges Hospital Campus, P.D'Melo Road, Fort, Mumbai-400 001

Website:www.msbnpe.orgE-mail- msbnpe@gmail.com. Mobile No- 8652281026


मराशुपशिमं/ ७५७/२०२१ दिनांक :- 25/05/२०२१

प्रति,

प्राचार्या/संस्थाप्रमुख

सर्व ए.एन.एम, जी.एन.एम. व पोस्ट बेसिक डिप्लोमा कोर्सेस संस्था,

महाराष्ट्र राज्य

विषय:- शैक्षणिक वर्ष २०१९-२० जी.एन.एम. आणि ए.एन.एम. अभ्यासक्रमाच्या पुरवणी परीक्षा घेण्याबाबत.

संदर्भ :- १.मंडळाचे पत्र क्र. मराशुवपशिमं/४००२/२०२० दि. १५/०९/२०२०

२.शासनाचे पत्र क्र. एएमसी-२०२०/ प्र.क्र.२१५/२०/शिक्षण-१ दि. ३० डिसेंबर,२०२०

३. मंडळाचे पत्र क्र. मराशुवपशिमं/६०२८/२०२१ दि. ०८/०२/२०२१

वरील संदर्भाधिन विषयान्वये शैक्षणिक वर्ष २०१९-२० जी.एन.एम. आणि ए.एन.एम. अभ्यासक्रमाच्या पुरणी परीक्षेबाबत सर्व प्राचार्या/संस्थाप्रमुख यांना कळविण्यात येते कि, शैक्षणिक वर्ष २०१९-२० जी. एन.एम. तृतीय वर्षाच्या व ए.एन.एम. व्दितीय वर्षाच्या परिक्षा मंडळामार्फत संदर्भ पत्र क्र. १ नुसार माहे ऑक्टोबर २०२० रोजी पार पडलेल्या आहेत. तसेच शासनाचे संदर्भ पत्र क्र. २ व भारतीय उपचर्या परिषदेच्या परिपत्रका नुसार जी.एन.एम. प्रथम व व्दितीय वर्षाच्या व ए.एन.एम. प्रथम वर्षाच्या परिक्षा या संस्थास्तरावर घेण्याबाबत निर्देशित केलेले होते. त्यांनुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२० जी.एन.एम. व ए.एन.एम. नर्सिंग अभ्यासक्रमाच्या परिक्षा घेण्यात आलेल्या आहेत.

वरील परिक्षाचा निकाल हा मंडळामार्फत मंडळाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आलेला असुन शैक्षणिक वर्ष २०१८-१९ व २०१९-२० च्या परिक्षामध्ये नापास झालेल्या विद्यार्थ्यांची पुरवणी परिक्षा भारतीय उपचर्या परिषदेच्या परिपत्रका नुसार व वार्षिक अहवालानुसार मंडळामार्फत सहा महिन्या मध्ये घेणे आवश्यक असते.

परंतु सध्या राज्यात असलेल्या कोरोना (कोविड-१९) ची सद्यस्थिती पहाता व विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करता संसर्गाचा प्रार्दुभाव रोखण्याकरिता विद्यार्थ्यांची पुरवणी परिक्षा कोव्हीड-१९ च्या परिस्थितीचा जिल्हानिहाय आढावा लक्षात घेऊन व शासनाने दिलेल्या COVID-१९ च्या मार्गदर्शकतत्वानुसार सदर पुरवणी परिक्षेचे वेळापत्रक व परिपत्रक ४५ दिवस अगोदर मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यास येईल यांची सर्व प्राचार्या/संस्थाप्रमुख यांनी नोंद घ्यावी व विद्यार्थ्यांना याबाबत कळविण्यात यावे.

संचालक

महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

DESKTOP-5/TRUPTI/NEW MICROSOFT FILE